श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर

प्रधान कार्यालय – वारणानगर ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

स्थावर मिळकत जाहीर लिलाव नोटीस

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की, आमच्या बँकेचे खाली नामनिर्देशित केलेले सभासद थकबाकीदार आहेत. त्यांचेकडे येणे असलेली संपूर्ण रक्कम वसुल करण्यासाठी बँकेने मा.सहाय्यक निबंधक, सहाकरी संस्था (परसेवा), इस्लामपुर ता. वाळवा जि.सांगली महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ नुसार अधिकार प्राप्त झाल्यावरून खालील थकबाकीदार यांची स्थावर मालमत्ता जप्त केली आहे. सदर जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या तारखेस, वेळी व ठिकाणी करण्यात येणार आहे. तरी ज्यांना सदरची स्थावर मालमत्ता बोली बोलुन घ्यावयाची असेल त्यांनी बँकेशी संर्पक साधून स्थावर मालमत्ता लिलावापूर्वी पाहुन घ्यावी. लिलावाच्या दिवशी व वेळी हजर रहावे. लिलावाच्या अटी व शर्ती बँकेमध्ये पाहणेस मिळतील.

अ.नं	थकबाकीदाराचे/मिळकत धारकाचे नांव	वसुली दाखला दिनांक व क्रमांक	वसुली दाखल्यामधील दावा रक्कम	मिळकतीचे वर्णन	लिलाव करण्याचा हिस्सा	निश्चित केलेली वाजवी किंमत	लिलावाची तारीख वेळ व ठिकाण
१	**कर्जदार** १. मे. समर्थ एंटरप्रायझेस प्रोप्रा.श्री. प्रकाश दगडू पाटील रा.आंबर्डे ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर **जामिनदार** २.श्री.अजय शामराव उरुणकर रा. निलेवाडी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर ३.श्री. विनय केशव झांबरे रा. वाळवा ता. वाळवा जि. सांगली ४.श्री. दगडू ज्ञानू पाटील रा. आंबर्डे ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर.	दि.०९/०१/२०२३ १०१/२५४/२०२२	रू.३,०७,६७१/- + व्याज व इतर खर्च	जामिनदार श्री. दगडू ज्ञानू पाटील यांच्या नावची जिल्हा व तुकडी कोल्हापूर पोट तुकडी व तहसिल शाहुवाडी मौजे आंबर्डे येथील १. गट नं.५४४ चे क्षेत्र ० हे.०४.०४ आर ची शेतजमीन २. गट नं.६८९ चे क्षेत्र ० हे.०१.७० आर ची शेतजमीन ३. गट नं.८०० चे क्षेत्र ० हे.१०.४३ आर ची शेतजमीन	संपुर्ण	एकुण रक्कम रू. ५,९७,२१०/- (अक्षरी पाच लाख सत्याण्णव हजार दोनशे दहा रुपये मात्र)	**दिनांक – २८/१०/२०२६** वेळ दुपारी १२.०० ते २.०० वा पर्यंत ठिकाण–श्री वारणा सहकारी बँक लि., शाखा ईश्वरपुर

टिपः

१. उपरोक्त नमूद स्थावर मालमत्ता बँकेच्या ताब्यात आहे. बँकेच्या माहितीप्रमाणे सरकारी, निमसरकारी बोजा नाही. तरी देखील खरेदीदाराने त्याबाबत खात्री करणे आवश्यक आहे.

२. स्थावर मालमत्ता **''जशी आहे जेथे आहे आणि तेथे जे आहे''** या तत्वावर विकण्यात येईल. यशस्वी प्रस्तावकास विक्री व्यवहार पूर्ण होण्यासाठी आवश्यक आकार/मूल्य जसे की, स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन फी इ. कायदयानुसार देय देणी द्यावी लागतील. बँक या संदर्भात कोणतीही आकार, बोजा, स्थावर मालमत्ता कर किंवा सरकारी किंवा अन्य मिळकतीच्या संदर्भ असलेले देणे देण्यास बांधील नाही.

लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :

१. उपरोक्त स्थावर मालमत्तेच्या लिलावाची राखीव किंमत **रू. ५,९७,२१०/-** इतकी असून त्यापेक्षा कमी बोली स्वीकारली जाणार नाही.

२. उपरोक्त स्थावर मालमत्तेच्या लिलावाची अनामत रक्कम **रु.५,०००/-** लिलाव तारीखेपर्यंत शाखा ईश्वरपुर येथे जमा करणेची आहे.

३. लिलाव मंजूर अंतरावर पूर्ण केला जाईल.

४. लिलाव ज्याच्या नावे मंजूर होईल त्याने लिलावाच्या बोलीच्या १५ टक्के रक्कम लिलाव दिवशी भरणेची आहे.

५. लिलाव मंजूर झालेनंतर लिलावधारकाने उर्वरित ८५ टक्के रक्कम ३० दिवसांत जमा करणेची आहे.

६. स्टँम्प डयुटी, रजिस्ट्रेशन फी, आवश्यक सरकारी, निमसरकारी रक्कम लिलाव यशवस्वी प्रस्तावकास १५ दिवसांचे आत बँकेत भरणे बंधनकारक आहे.

७. थकबाकीदाराने लिलाव पुकारल्यानंतर ३० दिवसाच्या आत संपूर्ण थकबाकी, नोटीस फी, लिलाव पुकारलेला खर्च इ. खर्च जमा करून लिलाव रद्द करणेस वसुली अधिकारी यांच्याकडे विनंती केलेस लिलाव ज्याच्या नावे मंजूर केला आहे त्यास बोली रक्कमेच्या ५ टक्के रक्कम मानधन म्हणून अदा करावी लागेल.

८. लिलावाच्या अटी व शर्तीमध्ये लिलाव स्थगित करणेचा अधिकार वसुली अधिकारी यांना राहिल.

९. लिलावात भाग घेण्यापुर्वी अटी व शर्ती वाचुनच भाग घेणेचा आहे.

ठिकाण - वारणानगर
दिनांक - २५/०९/२०२६

वसुली अधिकारी
श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर
ता. पन्हाळा जि. कोल्हापूर